RNI MAHMAR
36829-2010


ISSN - 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal

UGC-CARE LISTED



## RETHINKING MAHATMA GANDHI IN PRESENT CONTEXT

February 2020

Executive Editor : Dr. Kiran Save

Co-Editor : Dr. Tanaji Pol
Prof. Anagha Padhye Deshmukh

Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

Sonopant Dandekar Shikshan Mandali's

# Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce & M.H. Mehta Science College Palghar

## National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context

29th February 2020

**Convener**
**Dr. Kiran Save**
**Principal**

**Co-ordinator**
**Dr. Tanaji Pol**
**Asst. Prof. Vivek Kudu**
**Asst. Prof. Anagha Padhye Deshmukh**

'Akshar Wangmay' UGC Approved & Peer Reviewed International Research Journal
RNI: MAHMAR 36829-2010
ISSN : 2229-4929
February – 2020
Rethinking Mahatma Gandhi in Present Context


| | | | |
|---|---|---|---|
| ४५ | महात्मा गांधी: लोकशाही हा जीवनमार्ग | ॠतुजा राऊत | २५३.२५७ |
| ४६ | गांधीजींचे पर्यावरणवादी विचार | सोनाली महादेव पवार | २५८.२६७ |
| ४७ | गांधीजी आणि पर्यावरण | मनिषा नागुराव कामजी<br>ऐश्वरी शिवाजी खामकर | २६८.२७१ |
| ४८ | पर्यावरण विचार आणि गांधी | आर्यन एनेश नेरुरकर | २७२.२७८ |
| ४९ | गांधी ते महात्मा गांधींचा प्रवास | तनिका कल्याणकर | २७९.२८४ |
| ५० | गाँधी जी के टिप्पणी और विचार | फिरोज अलिम अली | २८५.२९० |
| ५१ | महात्मा गांधींचे आर्थिक विचार | प्रा. कु. सोनाली सुरेश पेकम | २९१.२९३ |
| ५२ | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार – काळाची गरज | डॉ. बी. एच. दामजी<br>डॉ. ए. व्ही. नामा | २९४.३०० |
| ५३ | महात्मा गांधी यांच्या दृष्टीकोनातून महिला सक्षमीकरण | डॉ. रमिला गायकवाड | ३०१.३०७ |
| ५४ | महात्मा गांधीच्या अहिंसा तत्त्वाची सद्यकालीन प्रासंगिकता | प्रा. धनराज सुभाष हाडुळे | ३०८.३१४ |
| ५५ | महात्मा गांधीजींची धर्म स्वातंत्र्याची संकल्पना | डॉ. बाळासाहेब मुळीक | ३१५.३२३ |
| ५६ | गांधीवाद आणि मराठी कविता | प्रा. विवेक वसंत कुडू | ३२४.३२९ |
| ५७ | २१ व्या शतकात 'सर्वोदय' विचारसरणीचे महत्त्व | प्रा. संध्या देवदत्त शिरोडकर | ३३०.३३४ |

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

# महात्मा गांधीः लोकशाही हा जीवनमार्ग

**ऋतुजा राऊत**
सहाय्यक प्राध्यापक,
मध्ययुरेशिया अभ्यास केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.
अभ्यागत प्राध्यापक,
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय,
पालघर.
Email Id& rautrutuja4167@gmail-com

"अहिंसा हा माझ्या श्रद्धेचा पहिला लेख आहे. तसेच तो माझ्या संप्रदायाचा शेवटचा लेख आहे".

— महात्मागांधी

**प्रस्तावना :**

मोहनदास करमचंदगांधी (महात्मागांधी) हे नाव उच्चारता डोळ्यासमोर उभे राहतात विविध क्षेत्रात मौलिक योगदान दिलेले गांधी. मग ते स्वातंत्र्य लढ्यातील राष्ट्रपिता असो वा दक्षिण आफ्रिकेत वंश भेदा विरोधी सत्याग्रह करणारे व समानतेसाठी लढा लढणारे बापू. एवढेच नव्हे तर तत्वज्ञानाला सत्याचे रूप देऊन पुनर्जीवन देणारे महात्मा गांधी हे वर्षानुवर्षे केवळ भारतीय लोकांच्या हृदयातच नव्हे तर अगदी १५० वर्षांनंतरही जगभरातील लोकांच्या मनावर राज्य करत आहेत. महात्मा गांधी हे नाव उच्चारताच डोळ्यासमोर उभी राहते ती एक विलक्षण प्रतिमा. एक साधे सरळ मात्र खंबीर व्यक्तिमत्व ज्याची ओळख भारतीयांनाच नाहीतर संपूर्ण जगास आहे. सत्याची ओढ धरून अहिंसेच्या मार्गावर चालणाऱ्या गांधींची कुणाला प्रचिती नाही?

'महात्मा गांधी यांच्यावर जगातील ८० पेक्षा जास्त देशांनी २५० पेक्षा जास्त खास टपाल तिकिटे काढली आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर पोस्टाची तिकिटे निघणारी महात्मा गांधी ही एकमेव भारतीय व्यक्ती आहे, आणि जगातील मोजक्याच व्यक्तीं वर इतक्या मोठ्या प्रमाणावर टपाल तिकिटे निघाली आहेत. अशी तिकिटे काढणाऱ्या देशांमध्ये इंग्लंड, अमेरिका, रशिया, दक्षिण आफ्रिका, जर्मनी, फ्रान्स, अर्जेन्टिना अशा अनेक देशांचा समावेश आहे.'' 'गांधी नावाची हाडामासांची व्यक्ती अस्तित्वात

होती, यावर नवीन पिढीला विश्वास चबसणार नाही. कारण असा आदर्श पुरुष पुन्हा होणे नाही', असे सुप्रसिद्ध वैज्ञानिक अल्बर्ट आईन्स्टाईन म्हणाले होते. अमेरिका सारख्या महासत्तेचा राष्ट्रपती बराक ओबामा, जुनिअर मार्टिन लुथरकिंग, तसेच दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रपती नेल्सन मंडेला, नोबल पुरस्कार विजेत्या ऑगसानसुकि, तिबेटियन लोकांचे प्रमुख नेतेद लाई लामा यासारख्या अनेक हस्तींवर गांधी आचरण व विचारांचा प्रभाव दिसून येतो. गांधी आपल्या विचार व तत्त्वज्ञानाने केवळ ह्याच व्यक्तीसाठी नव्हे तर जगातील कानाकोपऱ्यात राहण्याऱ्या सामान्य माणसांसाठी सुद्धा गांधी आदर्श ठरतात.

वेगवेगळ्या विषयांवर आपल्या विशिष्ट दृष्टिकोनातून प्रकाश टाकणाऱ्या गांधींच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात जरी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यापासून झाली असली तरी त्याची पाळेमुळे आपणास त्यांनी साकारलेल्या दक्षिण आफ्रिकेतील वंशभेद आणि वर्णभेदाच्या लढ्यातून दिसून येतात. "अनेक विद्यापीठात गांधी विचारांचा अभ्यास नव्याने सुरु झाला. त्याचे महत्व नवीन पिढीला रुजेल आणि समजेल अशा पद्धतीने मांडून त्याची वर्तमानातील समस्यांशी सांगड घालून उपयुक्तता तपासली जात आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण विषयक आंतरराष्ट्रीय परिषदेतही वेळोवेळी गांधी विचारला महत्व देण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्रसंघानेच निश्चित केलेले 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स' चा आधार ही गांधी विचारातच दडला आहे.''

## महात्मागांधी: जीवनप्रवास :

सत्याच्या मार्गावर चालून अहिंसेची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या गांधींचा जन्म २ ऑक्टोबर, १८६९ रोजी पोरबंदर येथे एका सामान्य कुटुंबात झाला. वडील करमचंद हे कुटुंबप्रेमी, सत्य प्रिय पण रागिट होते तर आई पुतळीबाई ह्या व्यवहार कुशल होत्या. विद्यार्थी दशेत सर्व सामान्य विद्यार्थ्यांसारख्या असणाऱ्या गांधींनी तारुण्यात अनेक चुका केल्या. मात्र पुढील जीवनात विविध प्रयोग करत असताना आपण केलेल्या चुकांची प्रामाणिकपणे कबुलीही दिली. 'हिन्दस्वराज', 'दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह', 'माझे सत्याचे प्रयोग', सारख्या साहित्याने गांधींनी सामाजिक जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यास महत्वाचे योगदान दिले आहे. पुस्तकेच नव्हे तर विविध भाषांत लिहिले गेलेले 'हरिजन', 'यंग इंडिया', 'नवजीवन' आणि आफ्रिकेत असताना 'इंडियन ओपिनियन' यासारखी त्यांची मासिके प्रख्यात आहेत. ''गांधींचे पूर्ण लेखन भारत सरकारने ''संकलित महात्मा गांधी'' (The Collected works of Mahatma Gandhi) या नावा खाली १९६० या दशकात प्रकाशित केले आहे. यामध्ये जवळपास १०० खंड व त्यांची ५०,००० पृष्ठ संख्या आहेत''. वडील करमचंद हे राजकोट येथील स्थानिक राजाचे दिवाण म्हणून काम पाहत असल्याने त्यांचे प्राथमिक शिक्षण तेथेच झाले. वयाच्या १३ व्या वर्षी कस्तुरबा (बा) शी लग्न झाले. गांधीजी १८८८ रोजी इंग्लंडला कायद्याची पदवी घेण्यास

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

रवाना झाले. इंग्लंडहून भारतात परतून काही काळ येथे वकिलीचा व्यवसाय करू लागले. मात्र यांनी निमित्ताने पुन्हा दक्षिण आफ्रिकेत रवाना झाले. दक्षिण आफ्रिकेतील संघर्षाने त्यांच्या जीवनाला नवीन वळण दिले आणि पुढे त्याचे रूपांतर इतिहास घडवण्यात झाले.

## दक्षिण आफ्रिकेतील लोकशाहीसाठी संघर्ष : गांधी तत्वज्ञानाचा मूलभूत पाया :

गांधींचा दक्षिण आफ्रिकेतील संघर्ष त्यांच्या उभ्या आयुष्यात महत्वाचा ठरतो. आयुष्याची २१ वर्षे ब्रिटिशांची वसाहत असणाऱ्या दक्षिण आफ्रिकेत घालवताना गांधींनी आपल्या राजकीय नेतृत्वाचा विकास केला. स्वत: अनुभवलेल्या हीन वागणुकी वरून त्यांना तेथील भारतीय लोकांच्या समस्यांचा आढावा आला व त्यांनी तेथे राहून त्या समस्या सोडवण्याचा ठाम निर्धार केला. भेद भावा मुळे मिळालेली तुच्छ वागणूक– मग ते रेल्वे मधून वर्णभेदावरून गाडी बाहेर ढकलून दिलेले असो वा प्रवाशांना वाट काढून न दिल्यामुळे मार दिलेला असो, यासारख्या प्रसंगांनी गांधींच्या मनावर खोलवर परिणाम केले होते. ''सन १९०६ साली ब्रिटिश सरकारने दक्षिण आफ्रिकेत वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांचा मतदानाचा हक्क काढून घेणारा कायदा लागू केला होता. त्यावेळी गांधीजींनी आफ्रिकेतील भारतीय नागरिकांना मदत करण्यासाठी आपला तेथील मुक्काम वाढवला, आणि भारतीय नागरिकांना राजकीय व सामाजिक हक्कांसाठी संघर्ष करण्याची प्रेरणा दिली.'' या संघर्षात त्यांनीच १८९४ रोजी स्थापन केलेल्या 'नाताळ भारतीय काँग्रेस' या राजकीय पक्षाची भूमिका मोलाची होती. सत्याग्रहाचे शस्त्र वापरून केवळ दक्षिण अफ्रिकेतीलच अन्यायाला तोंड दिले नाही, तर भारतात भ्रमंती केल्यानंतर ब्रिटिशांविरोधी हे अहिंसक शस्त्र वापरून स्वातंत्र्य चळवळ बळकट केली.

## सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह: गांधी तत्वज्ञानाची मध्यवर्ती मूल्ये :

व्यक्तीने आपल्या आचरणात सत्य, नम्रता, सहिष्णुता, प्रेम, प्राणिमात्रांवर दया यासारख्या काही मूल्यांचा अवलंब केला तर अहिंसेचा मार्ग खुला होतो. एखाद्या गोष्टीच्या उपलब्धीसाठी ती हिंसा करून मिळवणे हे कधीही योग्य नाही, असा गांधी विचार धडा देतो. अहिंसेचा थोडाही लवलेश जर व्यक्तीने आत्मसात केला तर किती तरी वाईट गोष्टी सत्कर्मी लावून माणसांचे आयुष्य बदलता येते. 'सत्याच्या शोधाची साधने जितकी कठीण तितकीच सोपीही आहेत. ती एखाद्या अभिमानी इसमाला अशक्य ही वाटतील आणि एखाद्या निष्पाप बालकाला अगदी संभवनीय वाटतील''. गांधींच्या मते सत्य आणि अहिंसा या दोन्ही एकमेकात गुंफलेल्या गोष्टी आहेत. त्या एकमेकांपासून विभक्त करता येत नाहीत. जर सत्य हे साध्य असेल तर ते प्राप्त करण्याचे अहिंसा हे एक साधन आहे. कोणत्याही प्रकारची हिंसाकरून ते प्राप्त करणे अशक्य आहे.

महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्वावर भगवदगीतेचा प्रभाव होता. त्याखेरीज जगातील महान विचारवंत लिओटॉल्स्टॉय, रस्किन, सॉक्रेटिस, हेनरी थोरो व गौतम बुद्ध सारख्या महान व्यक्तींच्या विचारांचा पगडा होता. तर रायचंदभाई व गोपाळ कृष्ण गोखले यांना गांधी आपले गुरु मानत. सत्याग्रहाच्या शस्त्राचा प्रयोग हा दैनंदिन जीवन पासून ते अगदी राजकीय प्रकरणात सु–शासनसाठीही करता येतो, हे गांधींनी जगाला दाखवून दिले. 'उपवास' यासंकल्पनेची सत्याग्रहाशी सांगड घालताना केवळ शारीरिक क्षमतेची ते पात्रता ठरवत नाहीत तर त्यामार्फत श्रद्धेद्वारे होणारी मानसिक शुद्धीचाही आढावा घेतात. एखाद्या अन्याय निवारण प्रक्रियेसाठी इतर सर्व प्रयत्न जर व्यर्थ ठरत असतील तर उपवास करून सत्याग्रह करण्यासारखा न्याय मिळवण्यासाठी आणखी दुसरा योग्य मार्ग नाही. महात्मा गांधींनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात वापरलेल्या सत्याग्रह याशस्त्राचा प्रत्यय बिहार मधील चंपारण सत्याग्रह, अहमदाबाद येथील गिरणी कामगार सत्याग्रह, तसेच खेडा सत्याग्रहातून येतो. पुढे हेच शस्त्र वापरून त्यांनी विविध चळवळींचे नेतृत्व करून भारताला स्वातंत्र्य मिळूवुन दिले. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात गांधीजींच्या सत्याग्रहांचे योगदान हेबहुब मूल्य ठरते कारण त्यांच्या आगमनाने भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा संघर्ष पूर्ण देशव्यापी झाला. मग ते खेडो–पाड्यातील विद्यार्थी असो वा शेतकरी, अशिक्षित महिला असो व इतर प्रमुख नेते. महात्मा गांधींनी तळागाळातील जनसामान्यांना एकत्र घेऊन स्वातंत्र्य लढ्याचे सामर्थ्य वाढवले.

## स्वातंत्र्य आणि लोकशाही :

गांधींची स्वातंत्र्याची संकल्पना ही खूप व्यापक आहे. व्यक्ती स्वातंर्त्याची जपणूक करून गांधी इतर व्यक्तींच्या स्वातंत्र्यावरही गदा येऊ नये याची काळजी घेतात. कारण शेवटी कोणतीही व्यक्ती हो एक व्यापक सामाजिक संरचनेचा घटक आहे. गुलामगिरीत राहणे ही व्यक्तीची एक मानसिक दुर्बल अवस्था दर्शविते. ज्या क्षणी कोणतीही व्यक्ती या पुढे गुलामगिरी करायची नाही असा ठाम निश्चय करेल, त्याच क्षणी ती व्यक्ती स्वतंत्र होईल. याचा संदर्भ भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात भारतीयांचा मानसिक बळ वाढविण्यासाठी गांधींनी केला. स्वातंत्र्याच्या विस्तृत कल्पनेत गांधी स्त्रियांची भूमिका महत्वाची मानतात. ब्रिटिश कालीन भारता संदर्भातील स्वराज्य म्हणजे भारताला सवृ प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्तता, स्वशासन–जेथे प्रत्येक व्यक्ती राष्ट्राच्या विकासासाठी आवर्जून आपले सहकार्य देईल. लोकशाही मध्ये सवृ सामान्य लोकांच्या इच्छेला महत्व दिले जाते. मात्र, असे करताना इतरांना असलेल्या अधिकारांचा, मतांचा व स्वातंत्र्याचा ही विचार केला जातो. बहुसंख्यांकांनी अल्पसंख्याक लोकांच्या मतांचा आदर करून, त्यांना ही लोकशाहीत त्यांचे हक्क बहाल केले पाहिजेत. "भारताच्या

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

खऱ्या लोकशाहीत प्रत्येक गावाला एक घटक मानले जाईल.... खरी लोकशाही केंद्रात बसलेल्या वीस लोकांद्वारे चालवली जाणार नाही. तिचे संचालन खालून म्हणजे प्रत्येक गावातील लोक करतील.'' गांधींची खरी लोकशाही व्यवस्था देशाचा सर्वात लहान मात्र बहुमूल्य घटक गाव खेड्यांमध्ये दडलेली दिसून येते. या गोष्टीचा प्रत्यय आपल्याला स्वातंत्र्योत्तर काळात विविध घटकांतून दिसून येतो. भारताच्या राज्यघटनेत समाविष्ट केलेली राज्याच्या धोरणांची मार्गदर्शक तत्वांमध्ये गांधी विचार झळकतो. इतकेच नव्हे तर घटना दुरुस्तीने अवलंबिलेल्या 'पंचायती राजव्यवस्थेची' पाळेमुळे देखील गांधी विचारांशी संलग्नित आढळून येतात. लोकमतही लोकशाहीची प्रबळशक्ती आहे. लोकशाहीत व्यक्तिची जबाबदारी ही सुनियंत्रित शासन राखण्यासाठी महत्वाची ठरते.

**निष्कर्ष :**

महात्मागांधी, एक ना दोन अनेक विविध प्रकारच्या संकल्पना आपल्या विशेष दृष्टिकोनातून मांडतात. प्रामुख्याने गांधींच्या सर्वोदय, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान, स्वदेशी आणि खादीचा वापर, विविध यशस्वीरित्या पार पडलेली सत्याग्रहे, राजकारणातील धर्माची भूमिका यासारख्या महत्वाच्या संकल्पना गांधी विचारांची व्याप्ती वाढवतात. मात्र हळहळू गांधी तत्वज्ञानाची समर्पकता कमी होताना दिसून येते. बदलत्या काळानुसार गांधी विचारांची उपयुक्तता कमी होत आहे, असा विचार करणारे समीक्षक अथवा टीकाकार असले तरी गांधी विचारांचे तत्वज्ञानातील बहुमूल्य योगदान विसरता येत नाही. निश्चितच बापूंची ही अमूल्य विचारधारा देशातीलच नव्हे तर जगातील असंख्य लोकांना प्रेरित करते.

**संदर्भसूची :**

१ सांगलीकर, महावीर, (मे २०१२),'गांधीजींची महानता आणि कावळ्याची कावकाव'
२ बोबडे, चंद्रशेखर, (ऑक्टोबर, २०१८), 'गांधी विचारांचे जगाला आकर्षण, 'लोकसत्ता टीम प्रकाशित
३ 'गांधींनी लिहिलेली पुस्तके', (जानेवारी, २०१९) https://marathi.webdunia.com/article/mahatma-gandhi/119012800018&1-html
४ https://www.majhimarathi.com/mahatma-gandhi/information-in&marathi/,
५ देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात अहिंसात्मकरित्या कार्य करणारे क्रांतिकारक राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा जीवन परिचय''